बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

## प्रसिद्धीसाठी

## बँक ऑफ महाराष्ट्रने सह - कर्ज (को- लेंडिंग )करण्यासाठी लोन टॅपशी सहकार्य करार केला

**पुणे , 9 फेब्रुवारी २०२१ : देशातील सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीची बँक म्हणजेच बँक ऑफ महाराष्ट्रने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना सह-कर्ज (को- लेंडिंग ) देण्यासाठी पुणे येथील मेसर्स लोन टॅप क्रेडीट प्रोडक्टस प्रायव्हेट लिमिटेड ह्या बिगर बँकिंग वित्तीय कंपनीसोबत दूरगामी सहकार्य करार केला आहे.**

को-लेंडिंग अंतर्गत प्रारूपानुसार कर्जदाराच्या सोयीनुसार डिजिटल कर्ज माध्यामावरून कर्ज मंजूर करून घेण्याची सुविधा असून त्यामध्ये कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय ग्राहकांचे प्राथमिक कर्ज प्रक्रीये पासून ते कर्ज वितरणा आणि संनियंत्रणा पर्यंत ऑन - बोर्डिंग होणार आहे. सदर सह - कर्ज प्रारूपानुसार बँकेचे उद्धासन ( एक्स्पोजर ) ८० % पर्यंत असून उर्वरित रक्कम **लोन टॅपतर्फे देण्यात येईल.**

आतापर्यत कर्जापासून वंचित असलेल्या व कमी कर्ज वितरण झालेल्या क्षेत्रांकडे कर्ज प्रवाह वाढविण्यासाठी व अंतिम लाभार्थ्याला परवडणाऱ्या किमतीला निधी उपलब्ध करून देण्यासाठी बिगर वित्तीय बँकिंग कंपन्यांच्या समोर असलेल्या रोखतेच्या पेचप्रसंगावर उपाय योजना करण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेने **सह - कर्ज (को- लेंडिंग ) प्रणालीची सुरवात केली असल्याचे मत बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी व्यक्त केले.**

**सह - कर्ज (को- लेंडिंग )प्रारुपामुळे प्राधान्य क्षेत्राचे कर्ज वाटप उद्दिष्ट गाठण्यात बँकेला मदत होईल असे बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी सांगितले. ह्या प्रारुपाचा सर्वांनाच लाभ होईल - विशेषतः बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांना ग्राहकांच्या व्यापक अभिगम मिळेल व कमी व्याजदराने बँकांकडून कर्ज मिळून ग्राहकांना अधिक लाभ होईल असेही त्यांनी सांगितले.**